**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून ४९३ कोटी रुपयांहून अधिक रकमेची मालमत्ता जप्त
- राहुल गांधी अपप्रचार करत असल्याचा आरोप करत भाजपाची केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार
- जातीधर्मात फूट पाडणाऱ्या भाजपा महायुतीला सत्तेतून तडीपार करण्याची काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची मागणी

  **आणि**

- भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदाचा ‘सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार’ ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नोईस यांना दिला जाणार

<><><><><>

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध अंमलबजावणी संस्थांच्या कारवाईत १५ ऑक्टोबरपासून आतापर्यंत ४९३ कोटी ४६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे. तर सी व्हिजिल ॲपवर आतापर्यंत आचारसंहिता भंगाच्या ४ हजार ७११ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४ हजार ६८३ तक्रारी निवडणूक आयोगाने निकाली काढल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कर्यालयानं दिली आहे.

<><><><><>

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस नेते राहुल गांधी अपप्रचार करत आहेत. त्यामुळं त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी भाजपाने आज केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली. गांधी यांनी भाजपावर राज्यघटना नष्ट करत असल्याचा खोटा आरोप करत तणाव निर्माण केल्याचं त्यांनी या तक्रारीत म्हटलं

असून आयोगाने यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. गेल्या आठवड्यात मुंबईत झालेल्या सभेदरम्यान राहुल गांधी यांच्या भाषणाचा संदर्भ देऊन त्यांना आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप भाजपाने केला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते अर्जुन राम मेघवाल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज मुख्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन ही तक्रार केली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत शिवसेनेनं आपली ताकद दाखवून दिली असून, विधानसभा निवडणुकीत विक्रमी यश मिळवू, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथं आयोजित प्रचारसभेत बोलत होते. ते म्हणाले....

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री (१७ सेकंद)**

काँग्रेसच्या पायाशी गहाण ठेवलेला धनुष्यबाण सोडवण्यासाठी आम्हाला उठाव करून सत्ताबदल करावा लागला, असं ते म्हणाले. लाडकी बहीण पुढचा हप्ता निवडणूक झाल्यावर लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केला जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केलं.

जालना जिल्ह्यात घनसावंगी इथंही त्यांनी आज प्रचारसभा घेतली. मराठवाडा आणि दुष्काळ हे समिकरण आपल्याला हद्दपार करायचं असून, विकासाच्या माध्यमातून मराठवाड्याला न्याय द्यायचा आहे, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र ओबीसी सेनेनं शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत संघटनेचे अध्यक्ष शरद भोवर यांनी ही माहिती दिली.

<><><><><>

महाविकास आघाडीचा निवडणूक जाहिरनामा फसवा असून त्यावर कुणीही विश्वास ठेवणार नाही, अशी टीका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेसने महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेची खिल्ली उडवली, मात्र आता ते याच योजने अंतर्गत महिलांना तीन हजार रुपये देऊ, असं आश्वासन देत आहेत असं बावनकुळे म्हणाले. राज्यातली जनता महायुतीलाच कौल देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीत भाजपानं ४०० हून अधिक जागा मिळवण्याचा निर्धार केला होता, तो पूर्ण झाला असता तर संविधान बदलण्याचा धोका निर्माण होऊ शकला असता, मात्र जनतेच्या जागरूकतेमुळे हे घडलं नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते जळगाव इथं प्रचारसभेत बोलत होते. भारतीय घटनेच्या संरक्षणासाठी सावधान राहिलं पाहिजे, असं ते म्हणाले.

देशातल्या शेतकऱ्यांच्या स्थितीवरही शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली. एका वर्षात ९०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नाही, असं ते म्हणाले. युवा आणि महिलांच्या समस्यांवरही त्यांनी चिंता व्यक्त केली.

<><><><><>

महायुती सरकारच्या काळात जीएसटीच्या माध्यमातून जनतेकडून पैसे वसूल करून तेच लाडकी बहीण योजनेद्वारे वाटले गेले, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली. ते आज पुणे जिल्ह्यातल्या पर्वती मतदारसंघातल्या प्रचारसभेत बोलत होते.

<><><><>

भारतीय जनता पक्षानं  नवी मुंबई माजी जिल्हाध्यक्ष संदीप नाईक आणि त्यांना समर्थन देणाऱ्या २५ माजी नगरसेवकांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. यासोबत बेलापूर विधानसभा मतदारसंघातल्या युवा मोर्चा आणि महिला मोर्चा अध्यक्षांना ही निलंबित केलं आहे.

<><><><>

भाजपाला विधानसभा निवडणुकीत पराभव दिसू लागल्यानं ते हिंदू-मुस्लीम मुद्दा उपस्थित करत आहेत, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.  ते आज यवतमाळ जिल्ह्यातल्या सभेत बोलत होते.

भाजपाचे नेते भाषणात महागाई, बेरोजगारी, शेतकरी यांच्याबद्दल न बोलता ‘बटेंगे तो कटेंगे’, ‘एक हैं तो सेफ हैं’, च्या घोषणा देऊन जनतेची दिशाभूल करत आहेत, त्याला बळी पडू नका. जातीधर्मात फूट पाडणाऱ्या भाजपा युतीला सत्तेतून तडीपार करा, असं आवाहन पटोले यांनी केलं.

<><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या

कार्यक्रमात आज पुणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

महायुती सरकारच्या काळात विदर्भाचा विकास झाला नाही, असा आरोप माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला. ते आज दारव्हामध्ये बोलत होते.

**होल्ड--बाईट-- उद्धव ठाकरे (१९ सेकंद)**

**<><><><><>**

काँग्रेस आणि भाजपा नागरिकांची फसवणूक करत असल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज वाशिम इथल्या प्रचारसभेत केली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी संविधानाच्या रंगावरून वाद घालून लोकांना भ्रमित करू नये, असंही आंबेडकर म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय संचार ब्यूरो, पुणे प्रादेशिक कार्यालयातर्फे राज्यातील १४ जिल्ह्यात आजपासून मतदार जागृती अभियान सुरु करण्यात आलं आहे. मतदारांना खात्रीने मतदान करण्याचं आवाहन करत शहर आणि ग्रामीण भागात दहा दिवस हा प्रचार रथ फिरणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यात जिल्हास्तरीय जनजागृती कार्यक्रमाला आज सुरुवात झाली. अहिल्यानगर जिल्ह्यातही पथनाट्याद्वारे आज मतदार जनजागृती करण्यात आली. सोलापूर जिल्ह्यात आज स्वीप व्हॅनचा प्रारंभ जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. धाराशिव जिल्ह्यातही मतदार जागृती यात्रेचा आज प्रारंभ झाला. ही यात्रा जिल्ह्यातल्या ५० गावांमधून फिरणार आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतल्या प्रत्येक मतदान केंद्रावर दिव्यांग मतदारांची ने आण करण्यासाठी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था करण्यात येणार आहे, अशी माहिती मुंबईचे जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिली आहे.

<><><><><>

उल्हासनगर महानगरपालिकेचे ५ कर्मचारी आणि या पथकातले पोलीस कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी निलंबित केलं आहे. निवडणूक कर्तव्यात कसूर केल्याबद्दल ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.

<><><><><>

भारत आणि रशियानं व्यापारी संबंध आणखी दृढ करण्याची गरज परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आज व्यक्त केली. मुंबईत भारत - रशिया व्यावसायिक परिषदेला ते संबोधित करत होते. रशियाचे प्रथम उप प्रधानमंत्री डेनिस मान्टुरोव्ह यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. दोन्ही देशांमधला व्यापार सध्या ६६ अब्ज अमेरिकन डॉलर आहे. २०३० पर्यंत हा व्यापार १०० अब्ज डॉलरच्या पलीकडे जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदाचा सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नोईस यांना दिला जाणार आहे. माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. गोव्यात २० नोव्हेंबरपासून हा महोत्सव सुरू होणार असून २८ नोव्हेंबरपर्यंत सुरू असेल. ऑस्ट्रेलिया या वेळेचा ‘फोकस कंट्री ऑफ द इयर’ आहे. या महोत्सवासाठी १०१ देशांतून १ हजार ६७६ प्रवेशिका आल्या

होत्या. त्यापैकी ८१ देशातले १८० चित्रपट महोत्सवात दाखवले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

भारतीय सिनेमा देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचं योगदान देत असल्याची माहिती प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी दिली. नव्या चित्रपट निर्मात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट नवोदित भारतीय दिग्दर्शक पुरस्कार यंदापासून सुरू होणार आहे.

**<><><><><>**

देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आज पदभार स्वीकारला. राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी खन्ना यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.  न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी १९८३ मध्ये वकिलीची सुरुवात केली. त्यांनी जानेवारी २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केलं आहे.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढील ४८ तास हवामान कोरडं राहील, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.